## आई

### ❋ स्मृतिसुमने ❋

वर्ष कसे हे सरून गेले
कळले मजला नाही
परि माऊली माया अमुचि
तिळभर आटली नाही ---- १

कितीक झाले त्यागी विरागी
गणती त्यांची नाही
परि मला वाटते त्यागाला तव
जगती उपमा नाही ---- २

अमोज आहे धनद्रव्यादि
कमी न कोणा काही
परि साध्य न झाले तव यत्नाविण
आम्हा यातले काही ---- ३

टिचभर अपुल्या जुन्या घराचे
रूपच बदलून जाई
परि मनात माझ्या तुझीच खोली
सदैव जागृत राही ---- ४

असतील झाल्या अगणित भगिनी
गृहिणी अन् माताही
परि मला वाटते तुझ्यासारखी
आई होणे नाही ---- ५

सकल जनांच्या सारून मोहा
दूरच गेलिस बाई
परि मनात माझ्या तव कवनांची
प्रतिमा तेवत राही ---- ६

कृष्णतुलेसम उणीव तुझी ही
सदैव भासत राही

तुला वाहतो स्मृतिसुमने ही
विनम्रभावे आम्ही ---- ७

* काव्यदीप *

काव्यदीपा हाती धरोनी
अमर तुला करणार
माऊली सदा तुला स्मरणार

आम्हाला जरी सोडून गेलिस
काव्यधना परि देऊन गेलिस
सकलांना ते वाटुन देण्या
कधी न विस्मरणार
माऊली सदा तुला स्मरणार ---- १

काव्यज्योतिच्या रूपे तुझिया
स्वर पडती तव कानी माझिया
दीपामधल्या स्नेहाला मी
कमी न पडू देणार
माऊली सदा तुला स्मरणार ---- २

काट्यामधुनी गुलाब फुलवित
सजविलेस तू अमुचे जीवित
जरतारी हे काव्यवस्त्र मी
लेउनिया जगणार
माऊली सदा तुला स्मरणार ---- ३

उठता-बसता कामही करता
विरली काया सकलांकरिता
कवितारूपी सदा तुझे मी
नाम मुखी धरणार
माऊली सदा तुला स्मरणार ---- ४

तुझ्याच रुपे विठूहरी तो
रोजच मजला दर्शन देतो
आठवरुपी मजजवळी तू

सदाचीच उरणार
माऊली सदा तुला स्मरणार ---- ५

तव आयुष्या झाले सोने
बैसविले तुज जवळी प्रभूने
काव्यदीपा देऊनि मज सुख
दिधले अपरंपार
माऊली सदा तुला स्मरणार -----६

स्थलकालाचे बंधन नुरले
अखिल विश्व हे तुझे जाहले
स्वप्नी परि मी कधी मधी तरी
अंकी तुझ्या निजणार
माऊली सदा तुला स्मरणार ---- ७

✻ आठवणी ✻

वर्षामागुनी वर्षे जाती
परी न जाती आठवणी
आठवणींची अनंत पुष्पे
असती माझ्या साठवणी ----- १

स्मृतीसुमनांच्या गंधकोशी गे
मरंद जो राही भरुनी
प्राशन करिता आनंदाने
अवतरशी तू मम सदनी ----- २

गुजगोष्टी त्या करीत असता
वेळेचे मज भान नुरे
अलगद उकले स्मृतिमंजूषा
सकलांची मग एकसुरे ----- ३

आठवणी तव काढीत असती
बागेमधली सर्व फुले
आठवणींच्या हिंदोळयावर

मन माझे मग घेत झुले ----- ४

नशीब अमुचे थोर म्हणूनी
लाभे माता तुज जैसी
अनंत असती स्मृती तुझ्या मी
गणती त्यांची करु कैसी ----- ५

आठवणी तव बुडूनि जाता
आनंदाचे ऊन पडे
चरणधूलि तव सदनी लागता
सोनियाचा कळस चढे ----- ६

✼ स्मरण ✼

स्मृतिखजिन्यातुनि तुझिया मिळती
मजला अमोल रत्ने गं
फिकेच पडती पुढती ज्याचिया
पैसा नि दागिने गं ---- १

मूर्ती वसते तुझी मन्मनी
सुचवित मज नव कवने गं
अर्पियली मी तव चरणी ही
अगणित पुष्पे सुमने गं ---- २

या जन्मी तरी फिटणे नाही
अमोज हे तव देणे गं
आठव त्याचा ठेऊनी मीही
साकारिन तव लेणे गं ---- ३

अशीच येई गीतामधुनी
दावित नित नवकिरणे गं
अवचित ऐशा भेटीमधुनी
उपकृत अमुचि सदने गं ---- ४

तुझियाविण मनमंदिर मजला

वाटे सारे सुने गं
देवचि भेटे मजला वाटे
केवळ तुझिया स्मरणे गं ---- ५

✲ आई म्हणजे ✲

आई म्हणजे
जशी –
तान्हुल्याची माऊली
जशी –
वासराची गाऊली
जशी –
वृक्षाची सावली ---- १

आई म्हणजे
जशी –
अंबरीची चांदणी
जशी –
भरजरीची पैठणी
जशी –
तुळस उभी अंगणी ---- २

आई म्हणजे
जसा –
निराधाराला आसरा
जसा –
गाईचा कासरा
जसा –
सणात दसरा ---- ३

आई म्हणजे
जशी –
आंधळयाची काठी
जशी –
सायसाखर वाटी
जशी –

विठू माऊली भेटी ---- ४

आई म्हणजे
जसा –
पंख असे पाखरा
जसा –
मोराचा पिसारा
जसा –
सागराचा किनारा----- ५

आई म्हणजे
जशी –
गाभाऱ्यातील मूर्त
जसे –
कोटी देवांचे तीर्थ
जसे –
स्वर्गामधले अमृत ---- ६

## ✻ सम ✻

तुजी माझी सम सांग
एक कशी जुळते
मी मनापासून घातलेली साद
तुला अचूक कशी कळते ---- १

तुझ्या माझ्यात आहे
चार दशकांचे अंतर जरी
वाटतेस मात्र मला तू
जिवलग मैत्रीण खरी ----२

तुझ्या मनातल्या उभ्या आडव्या
विचारांची वीण मला नेमकी गवसते
अन् वाऱ्याच्या वारुवर स्वार झालेले
माझे मन तुझ्याकडेच धाव घेते ---- ३

✻ जिद्द ✻

तू आहेस आभाळाएवढी
खूप खूप मोठ्ठी
बळ ओतलेस पंखात आमच्या
गरुडझेप घेण्यासाठी ----- १

संसाररथाचे एक चाक
अचानक निखळून पडले
पण तुझ्या एकटीच्या खांद्यात
दहा हत्तींचे बळ संचारले -----२

दिवस–रात्र तहान–भूक
कश्शाचीही पर्वा न करता
संसाररथाला पैलतिरी पावते केलेस
जिद्दीने संकटांना न डगमगता ----- ३

✻ एकही ✻

एकही क्षण असा जात नाही की
तुझी आठवण येत नाही ---- १

एकही सण असा जात नाही की
तुझ्याविना घास खाली उतरत नाही ---- २

एकही वस्तू अशी सापडत नाही की
ज्यावर तुझा हात फिरला नाही ---- ३

एकही व्यक्ती अशी भेटत नाही की
तुझा शुभाशीष जिला लाभला नाही ---- ४

✻ सुमनमाला ✻

पाहते अन् ऐकते मी
त्वत् गुणांच्या गौरवाला

साश्रुनयनी पाहते मी
या जगाच्या नाटकाला ---- १

‘ एकी धरा अन् नको दुही ’
स्मरू तुझ्या या संदेशाला
‘करित रहावी कर्तव्ये ही ’
स्मरण तुझे हे पुढील पिढीला ---- २

सुवर्णपुष्पे गुंफिते ही
आठवणींची या समयाला
चरणकमली अर्पिते मी
भावनांची सुमनमाला ---- ३

## * तुझ्यामुळे *

तुझ्या स्मृतींच्या उबेत
उमलत गेली एकेक पाकळी
माझ्या मनाची ---- १

तुझ्या आशीर्वादरूपी
हळुवार स्पर्शाने खुलली कळी
माझ्या मनाची ---- २

तुझ्या आधारावरच
फुलारून आली प्रत्येक झावळी
माझ्या मनाची ---- ३

केवळ तुझ्यामुळे
जुळली गेली अखंड साखळी
माझ्या मनाची ---- ४

तुझ्या पाठिंब्यावरच
इमारत उभारली आगळीवेगळी
माझ्या मनाची ---- ५

तुझ्या प्रेमळ सोबतीने
येता या राऊळी, उलघाल थांबली
माझ्या मनाची ---- ६

✻ हौस ✻

नाही मजला छंद दूसरा
पायी तुझिया देई आसरा
गुरु सखा खरा तूच यादवा
हौस एवढी पुरवि केशवा ---- १

प्रेमे पूजिती राऊळी जरी
वसशी तू खरा हृदयमंदिरी
नामी तुझिया अमृती गोडवा
हौस एवढी पुरवि केशवा ---- २

भेटीची तुझ्या ओढ लागली
पैलतीरासी दृष्टी लागली
मार्ग दाखवी तू रमाधवा
हौस एवढी पुरवि केशवा ---- ३

जवळी बैसवी निववी अंतरा
विनविते तुला मी रमावरा
कणव का तुला ना येई माधवा
हौस एवढी पुरवि केशवा ---- ४

✻ मुरली ✻

कृष्णा वाजव रे मुरली
मुरलीने भूक नुरली ---- ।।ध्रु।।

गोपी निघाल्या लवकरी
जाण्या मथुरेच्या बाजारी
करण्या गोरस विक्री

कृष्णा वाजव रे मुरली ---- १

पेंद्याचंद्या रे बल्लारी
गाई घेऊनि जा नदीतीरी
परतुनि या लवकरी
कृष्णा वाजव रे मुरली ---- २

गोपी आणिती तक्रारी
काय कमी रे तुज घरी
न करी गोरस चोरी
कृष्णा वाजव रे मुरली ---- ३

उघडी वदना मुरारी
दूर सारी रे बासरी
नवनीत ना अंतरी
कृष्णा वाजव रे मुरली ---- ४

विश्वरूपाच्या दर्शनी
झाली यशोदा बावरी
हृदयी त्या कवटाळी
नक्को वाजवु रे मुरली ---- ५

## ✼ राधा ✼

स्वप्नी माझिया कुणीतरी आले
डोळयांच्या कडा टिपून गेले
सखये माझे भान हरपले
काहीही मजला कळेना झाले ---- १

कुंजवनी मी जेधवा गेले
स्वप्नीचे रूप नयनी आले
जळी–स्थळी अन् पाषाणी भले
सगुण सुंदर रूप दिसले ---- २

मुरलीचे सूर कानी आले
अमृतधारांनी न्हाऊनी गेले
राधेचे मन तल्लीन झाले
कृष्णरूपात विलीन झाले ---- ३

✻ देव दिसला ✻

देव दिसला बाई देव दिसला
कृष्णरुपाने अवतरला ---- ।।ध्रु.।।

धावे जनीच्या हाकेला
मदत करी तो दळायला
मीराबाईचा विषप्याला
पिऊनी झाला तो काळा ----१

भोळया तुक्याच्या नामाला
कधी न हरि तो विसरला
काढुनि वरती गाथेला
दर्शन दिधले जनतेला ----२

आवडी नाम्याच्या भक्तीला
नाम्यासाठी हरि भुकेजला
कावडी घेऊन पाण्याला
श्रीखंड्या तो कधी बनला ---- ३

सुदामदेवाच्या मैत्रीला
जागुन चाखी पोह्याला
दुर्जनास ना गवसला
विदुराघरी परि तो रमला ---- ४

वदण्या गीता जनतेला
ज्ञान्याहृदयी तो वसला
धावुनी आला मदतीला
रेड्यामुखी वेद वदविला ---- ५

संकटी रक्षी जगताला
गोवर्धन हाती धरीला
वदनी विश्वरुपाला
दावी यशोदामातेला ---- ६

देव दिसला बाई देव दिसला
कृष्णरुपाने अवतरला ---- ।।ध्रु.।।

✻ आस ✻

देवा तुझा ध्यास / लागलासे खास /
लागे मज आस / दर्शनाची //१//

देवा तुझ्या पायी / ठेविते मी डोई /
आहे तुझ्या ठायी / भक्ती माझी //२//

देवा तुझा छंद / हाच माझा बंध /
वाया हा सत्संग / जावो नये //३//

देवा तुझ्या नामी / लागे मज प्रीती /
ठेवी माये माथी / कृपादृष्टी //४//

देवा तुझ्या दारी / कोणी ना भिकारी /
प्रेमे जेवू घाली / निजकरे //५//

✻ अभंग ✻

जगी कोणीही नसतोच स्वयंपूर्ण
एकमेकाविण नरनारीही अपूर्ण ---- १

येतजाता तू एकटाच असती
संगतीला दो-चार पावलासी ---- २

कुणी न येती परि कीर्तीविना अंती
आईवडिलांविण नाही कुणा खंती ---- ३

उठतबसता तू म्हणत जा अभंग
शेवटाला परि तोचि पांडुरंग ---- ४

✻ माघारी ✻

आली आहे मोठी
आस घेऊनी मी उरी
नको धाडू रे माघारी, विठूराया ---- १

नाही रमत रे मन
आता या संसारी
नको धाडू रे माघारी, विठूराया ---- २

भातुकलीच्या खेळाची
हौस फिटली रे सारी
नको धाडू रे माघारी, विठूराया ---- ३

झाले करुन उपास
व्रतवैकल्येही सारी
नको धाडू रे माघारी, विठूराया ---- ४

दु:खाचे डोंगर हे
आले घेऊन डोईवरी
नको धाडू रे माघारी, विठूराया ---- ५

कर हलके हे दु:ख
नाही सोसवत भारी
नको धाडू रे माघारी, विठूराया ---- ६

✻ वारी ✻

चला जाऊ पंढरी वारीला ---जाऊ वारीला

विठुरायाच्या भेटीला ----।। ध्रु ।।

अभंग गाणी गायाला
साऱ्यांनी मिळून ऱ्हायाला
मिळेल ते चालेल पोटाला
विठुरायाच्या भेटीला ---- १

एक तरी ओवी अनुभवायला
ज्ञानबा तुकाराम म्हणायला
साऱ्यांनी एकरूप व्हायाला
विठुरायाच्या भेटीला ---- २

देवाच्या जाताना भेटीला
दोन गोड शब्द गाठीला
दरवर्षीच्या आषाढीला
विठुरायाच्या भेटीला ---- ३

चंद्रभागा नदीतीराला
नामदेव पायरी गाठायला
गरूडखांबा हात लावायला
विठुरायाच्या भेटीला ----४

संत जनांच्या माऊलीला
विठुच्या पायी मिठी घालायला
वय जरी आले आपले साठीला
विठुरायाच्या भेटीला ----५

## * राऊळ *

राऊळाच्या दारी येण्या
नाही कोणी संग
राऊळाच्या दारी येता
भेटला अभंग ---- १

तुझ्या पायी येता सारे

विरती भावबंध
तुझ्या पायी नाही कोणी
राव आणि रंक ---- २

मनाचा ना लागे कोणा
इतुकाही थांग
कसे करू देवा आता
तूच मला सांग ---- ३

संसाराचा पाहिला मी
राग आणि रंग
नामाचा रे तुझ्या परि
आगळाच ढंग ---- ४

जो तो आहे आपुल्याच
संसारात दंग
मीही आता जाहले रे
पुरती नि:संग ---- ५

मन माझे जाहले रे
आज बा पाखरू
राऊळाची वाट तुझ्या
कशी रे विसरू ---- ६

हात दे रे देवा आता
अंत नको पाहू
राऊळात तुझ्या कैसी
पुन्हा सांग येऊ? ---- ७

✼ पिंकी ✼

एक होती पिंकी
आईची भारी लाडकी
चाल तिची दुडकी

खेळत राही सारखी ---- १

खेळण्याच्या टोपलीत
होतं एक झुरळ
फ्रॉकवर पिंकीच्या
जाऊन बसलं सरळ ---- २

घाबरगुंडी उडाली
पिंकी पळू लागली
आईला बिलगताच
भीती दूर पळाली ---- ३

## ✲ चिमुकली चिऊताई ✲

चिमुकली चिऊताई
कंटाळयाचे नाव नाही
पंखाचा पदर बांधून
एकसारखी कामाची घाई ---- १

काय खाऊ काय खाऊ
म्हणत असतात कावळेभाऊ
संपत नाही हट्ट
म्हणून झाले आहेत मठ्ठ ---- २

पोपटदादा हिरवागार
चोच याची बाकदार
तिखट्ट मिरची खातो
तरी गोड गोड बोलतो ---- ३

कुत्रोपंत आलात काय ?
शेपूट हलवून सांगतात काय ?
ताजी पोळी वरती साय
खूप आवडती म्हणताय काय ? ---- ४

## ❋ मधमाशी ❋

मधमाशी, मधमाशी, मधमाशी
गुण गुण करशी
भिर भिर फिरशी
दम दम दमशी
एका जागी बैस जराशी ---- १

मधमाशी, मधमाशी, मधमाशी
एकटी दुकटी
तू मधमाशी
मधाच्या बाटल्या
भरतेस कशी ? ---- २

मधमाशी, मधमाशी, मधमाशी
पैशाचा बटवा
घेऊन जा तुला
अन् मधाची बाटली
आणून दे मला ---- ३

आवळीजावळी पिंटू नि पिंकी
सांगते ऐका
भावंडे माझी
सतराशे साठ
पण सारी कामाची ---- ४

आवळीजावळी पिंटू नि पिंकी
मध नाही आणत
बाजारातून विकत
फुलातून हिंडत
घेऊन येते फुकट ---- ५

आवळीजावळी पिंटू नि पिंकी
जवळ नका येऊ
नाहीतर देणार नाही खाऊ

त्रास नका देऊ
नाहीतर चावा आम्ही घेऊ ---- ६

### * ड्रायव्हर *

एकदा काय झाले सांगते
बसा सारे खालती
उंदीरमामा सापडला
मांजरोबाच्या हाती ---- १

मामाने मग केला
गणपतीचा धावा
'वाहन मी होईन तुमचे
मला आता पावा ---- २

नाही म्हणू नका तुम्ही
गणपतीराया
तुमच्याच चरणी
वाहीन ही काया' ---- ३

मांजरोबा पण मनी म्हणे
'देवाधिदेवा,
उंदराचा हा नैवेद्य
गोड करुन घ्यावा' ---- ४

खोटे खोटे डोळे मिटून
मांजर बसले ध्यानाला
मामांनी मग तेवढ्यात
सूंबाल्या केला ---- ५

फळ मिळे उंदराला
गणपतीच्या भक्तीने
तावडीतून मांजराच्या
सुटका केली युक्तीने ---- ६

तेव्हापासून गणपतीची

स्वारी खूष झाली
'ड्रायव्हर' म्हणून उंदराची
नेमणूक केली ---- ७

✻ उतराई ✻

तान्हुले हे रूप अपुले
पाहिले मी डोळा
मनी फुलुनि येई खरा
मायेचा फुलोरा ---- १

केस काळे कुरळे अन्
निळे निळे डोळे
पाहुनिया मन माझे
मोहुनिया गेले ---- २

लाल गोऱ्या गालांवर
पडे गोड खळी
जणू हसुनि म्हणे मला
घेई गं जवळी ---- ३

प्रेमाचे हे रुप नवे
मनी भरुनि राही
याचसाठी जाहले मी
आज खरी आई ---- ४

झोपले हे बाळ गुणी
नका बोलू कोणी
मीठ मोहरी ही कुणी
टाका ओवाळोनी ---- ५

माया मज माऊलीची
कळे आज बाई
देवाजीची कशी मी
होऊ उतराई ---- ६

✻ पाळणा ✻

सोनुलीच्या आगमने
जणू होई उषःकाल –––– सखे पाळणा सांभाळ

सोनुलीच्या दरशने
जणू भेटे घननीळ –––– सखे पाळणा सांभाळ

लाडे लाडे मामा म्हणे
हिला मिलेनिया बाळ –––– सखे पाळणा सांभाळ

वेगे वेगे नका झोका देऊ
झोपलीसे बाळ –––– सखे पाळणा सांभाळ

सोनीसंगे खेळताना
कसे पळते घड्याळ –––– सखे पाळणा सांभाळ

सोनुलीच्या बारशाला
बाळ जमले गोपाळ –––– सखे पाळणा सांभाळ

फ्रॉक रेशमाचा अंगी
घाली सोनियाच्या माळ –––– सखे पाळणा सांभाळ

जरी रेशमाचे टोपडे
अन् मखमली झूल –––– सखे पाळणा सांभाळ

गाली रेखला गं तीळ
हळू घातले काजळ –––– सखे पाळणा सांभाळ

कवतुके बघताना
भरे नयनी का जल? –––– सखे पाळणा सांभाळ

काढ दृष्ट हिची रोज
ठेव याद सायंकाळ –––– सखे पाळणा सांभाळ

शुभाशीष देते प्रेमे आजी

गुणाची हो बाळ –––– सखे पाळणा सांभाळ

✻ बारसे ✻

सोनुलीच्या आगमनाने
रोज दिवाळी नि दशहरा
मंगल दिन हा सोनियाचा
मंगल क्षण आला घरा –––– १

आई–बाबा आजी–आबा
नवनाते ये आकारा
मंगल दिन हा सोनियाचा
मंगल क्षण आला घरा –––– २

ताई–दादा सांगताती
खेळण्यांची त्वरा करा
मंगल दिन हा सोनियाचा
मंगल क्षण आला घरा –––– ३

फुले नि माळा लेऊनी
दिसे पाळणा गोजिरा
मंगल दिन हा सोनियाचा
मंगल क्षण आला घरा –––– ४

पाळण्याच्या सभोवती
साऱ्या मिळुनी फेर धरा
मंगल दिन हा सोनियाचा
मंगल क्षण आला घरा –––– ५

नामकरणाचा सोहळा
करुया आपण साजरा
मंगल दिन हा सोनियाचा
मंगल क्षण आला घरा –––– ६

पेढे बर्फी खाऊनी
तोंड आपुले गोड करा

मंगल दिन हा सोनियाचा
मंगल क्षण आला घरा ---- ७

कीर्तीपताका यशोमतीची
उजळो नील अंबरा
मंगल दिन हा सोनियाचा
मंगल क्षण आला घरा ---- ८

शुभाशीष हा आजी देते
स्मरूनिया त्या रमावरा
मंगल दिन हा सोनियाचा
मंगल क्षण आला घरा ---- ९

## ✲ बाळरुप ✲

पैसा-अडका दागदागिने
काहीच नाही अपेक्षा
बाळरुपात देव पाहणे
हीच केवळ प्रतीक्षा ---- १

विसरती मग जगताला
लहानग्यांशी खेळताना
भूतकाळात हरवून जाती
डोळे हळूच टिपताना ---- २

दुधापेक्षा प्रेम असते
सायीवरती खूप अनूप
लोण्यापेक्षा नाजुक असते
लोणकढे साजुक तूप ---- ३

नातवंडात इवल्या दिसे
आजी आजोबांना खूप
आपल्या सानुल्या बाळांचे
गोजिरवाणे बाळरूप ---- ४

### ✻ सोनुला ✻

उन्हं आली गं कोवळी
सोनभरल्या सकाळी
माझ्या सोनुल्याच्या गाली
उमटली गोड खळी ---- १

उन्हं आली गं कोवळी
पक्षी गाती गोड गाणी
माझ्या सोनुल्याच्या हाती
सायसाखरेची वाटी ---- २

उन्हं आली गं कोवळी
सोनपाऊले घरात
माझ्या सोनुल्याच्या पायी
सुख आले ठायी ठायी ---- ३

उन्हं आली गं या वेळा
मीठ मोहरी ओवाळा
माझ्या सोनुल्याच्या भाळा
लावा कुंकवाचा टिळा ---- ४

उन्हं आली गं खालती
उधळीत हिरेमोती
माझ्या सोनुल्याच्या बाई
वाढदिवसाची घाई ---- ५

### ✻ दोन शब्द ✻

अनंत कोटी त्या परमेशाचे
स्मरण कराया विसरु नका ---- १

अनंत असती आशा अमुच्या
निराश तुम्ही करू नका ---- २

अनंत असती मोहसक्ती

भक्ती तयाची करू नका ---- ३

आल्यागेल्या अतिथीशी तुम्ही
गोड बोलण्या विसरु नका ---- ४

मिळवा उदंड यशकीर्तीला
नीतीला परी सोडू नका ---- ५

उपदेशाचे दोन शब्द हे
राग तयाचा मानू नका ---- ६

* दुलई *

मऊशारशी आठवणींची
दुलई विणली तुजसाठी ही
इ मेलमधुनी पाठविते जरि
पांघरुन तू सुखे पहा तरि ---- १

इवलालीशी बोटे तुझी ती
पडती जेधवा गळ्याभोवती
स्वर्ग स्वर्ग तो कशास म्हणती
मजला आली होती प्रचीती ---- २

आठवणी तव अनंत असती
रुंजी घालती मनाभोवती
मोठी झाली मुले जरि किती
सानचि असती मातपित्या ती ---- ३

* लाडका लेक *

लाडका लेक घरासी येता
आनंदाते उधाण येई ---- १

कौतुकाने त्याकडे पाहता

बाळपणीची सय येई ---- २

फार दिसांनी दर्शन होता
मायेने उर भरुनी येई ---- ३

आठवणींची गर्दी होता
नयनी जल भरुनी येई ---- ४

डोळयांची कड ओली होता
हळुच पुसुनी हसुनी पाही ---- ५

देवाच्या चरणी टेकता माथा
पुत्रसुखाविण मागे न माई ---- ६

✼ बाळराज ✼

वाट पाहताना आज / डोळे शिणले गं माझे /
येणार बाळराज / आज घरी //----- १

डोळा मिटेना मिटेना / नीज येईना नयना /
किती करु आराधना / देवराया //----- २

आत बाहेर तरी / किती करु येरझारी /
भांडे पालथे हे दारी / घातले गं //----- ३

कधी पाहीन बाळास / हीच एक लागे आस /
मनी बोलले नवस / नारायणा //----- ४

हासे गुलाब केवडा / पारिजाताचा गं पडे सडा /
दारी पाहता गं खडा / बाळराज //----- ५

✼ ओढ ✼

बाळपणीचा देवचि आई
स्वर्गसुखाची ठेवचि आई

साडीचा परि शेव तिच्याही
हाती असता चिंता नाही ---- १

शाळेमध्ये मित्र भेटता
खेळाची ती ओढ लागता
वेळेचे मग भानचि नुरता
आनंदाचा गवसे साठा ---- २

तरूणपणाच्या मधुर जीवनी
अनंत शिल्पे मनी कोरली
संगत त्यांची क्षणिक ठरली
मनिची आशा मनी निमाली ---- ३

शिल्पांची त्या संगत नुरता
घेरुनि येई उदासीनता
आठव घरचा येई आता
मनास लाभे खरी शांतता ---- ४

संसाराची ओढ लागता
उठता बसता हसत खेळता
संसारी मग मन हे रमता
विरती सगळया भ्रामक चिंता ---- ५

अखेरच्या त्या टप्प्यावरती
ओढ एकचि मना असे ती
ध्यानी मनी अन् स्वप्नी दिसे ती
परमेशाची सदैव मूर्ती ---- ६

## ✻ बंधन ✻

विचारता जरी भाऊ कसा
भाऊ कसा माझा भाऊ कसा ?
आवडे मजला असे तसा
नि वाटे सकला हवासा ---- १

आठवते ते सारे मजला

होता जेव्हा इवलासा
सोज्वळ वदनी भावुक डोळे
रूपगुणांचा जणू आरसा ---- २

मायेचा जणू घेई वसा
नि पाठीशी तो उभा तसा
प्रेमाने मी साद घालता
धावत येई देव जसा ---- ३

स्मरण ठेवुनी भाऊबीजेचे
समयी येई मम सदनी
सुहास्य वदनी भेट देत तो
ओवाळुनि घे मजकडुनी ---- ४

विचारता जरी ताई कशी
ताई कशी माझी ताई कशी ?
प्रेमाची जणू मूर्ति साजिरी
ताई माझी असे तशी ---- ५

मूर्ति तियेची नाजुकशी
परि कीर्ती तियेची परदेशी
जगही ओळखी सारे तिजला
भगिनी तीच ना सुकेशी ---- ६

राखी बांधी प्रतिवर्षी ती
आठवणीने मज हाती
औक्षण करता प्रेमाने ती
गाली ओघळती मोती ---- ७

तिच्या गुणांचे वर्णन करण्या
शब्द न असती मजपाशी
ताई–भाऊ अतूट बंधन
उपमा देऊ त्या कैसी ? ---- ८

### ❋ अपूर्व प्रेम ❋

दो हाताविण टाळी न वाजे
कधीही या जगती
एकचि नाणे दो बाजूंनी
दिसती पत्नी पती ----१

सागरातल्या शिंपेमध्ये
जैसे दो मोती
दो घटकांच्या भवर्णवामधि
तैसे पत्नी–पती ----२

सप्तपदीही करती दोघे
हाता घेऊन हाती
उभयजनांच्या आनंदाने
संसारा ये गती ----३

घासही राही अडून कंठी
एकदुजासाठी
एकदुजास्तव दोघा वाटे
माया करू किती ----४

गतकाळाते स्मरता स्मरता
आनंदे नांदती
वर्णन करण्या अपूर्व प्रेमा
शब्द न सापडती ----५

### ❋ गुरुदक्षिणा ❋

मातापिता हे प्रत्येकाचे
पहिले वहिले गुरू हो
त्याजविणा मी दुजा कोणा
सांगा कैसे स्मरू हो ---- १

मायेचा हा मेरु आणि

कर्तव्याचा तरू हो
आयुष्याच्या वळणावरचा
दीपच जैसा तारू हो ---- २

गोमातेच्या जवळी जैसे
बागडते वासरू हो
गगनी जेवि भिरभिरणारे
इवलेसे पाखरू हो ---- ३

गुरु ठायी मी सदैव तैसे
लहानगे लेकरू हो
आदर्शाची खाण जणू ही
दूर कैसी सारू हो ---- ४

प्रणतीविण त्या एकही माझा
दिवस होईना सुरू हो
दुजी काय मी देऊ दक्षिणा
कैसी त्या विस्मरू हो ---- ५

कूर्मापरि ती दृष्टी गुरुची
फुलवि मनाचा बहरू हो
आशीर्वच त्या मानुनि मग ही
लेखणी लागे झरू हो ---- ६

## * विहिण *

बहिण आहे मी विहिण नसे तुमची
लेक आमुची ही सून होई तुमची
लेक दिधलीसे आम्ही तुम्हा हाती
तुम्ही शिकवा तुमच्याही रीतिभाती ---- १

प्रेम लेकीपरि जगी अन्य नाही
तुम्हा विनवीते लेकीचीच आई
सांगणे हे जरि उचित नसे काही
परि मजला ते राहवे न बाई ---- २

विहिणबाई तुम्ही सावकाश जेवा
तुम्हा हाती हा देत आम्ही ठेवा
दिवस इतुके हा जपुन वाढवीला
सुखे अर्पाया आलो या घराला ---- ३

दोन शहरांचे संबंध जुळुनी येता
माऊली ही मनी धन्य होई आता
ठेव दिधली ही असे ज्याची त्यांना
सुखी ठेवो प्रभु दोनही कुळांना ---- ४

(चाल बदल)

कन्या असे हे धन दूसऱ्याचे
ठाऊक होय सकला मुनि कण्ववाचे
आता न शब्द सुचती वदण्या मनीचे
समजून हेतु परि घ्या अमुच्या मनीचे ---- ५

## * दोन नाती *

दोन नात्यातील अंतरा पुसोनी
सून–सासू संबध येती जुळुनी ---- १

घरा येता ती लेक परगृहीची
सून होई लक्ष्मीच स्वगृहीची ---- २

मायलेकीपरि प्रेम दुजे नाही
जगी ऐसी ही रीत असे बाई ---- ३

सूनबाई त्वा लेक सासू आई
सुखे नांदावे जगी धन्य होई ---- ४

लेक समजावी आपुली सासूबाई
आई समजावी तूही सूनबाई ---- ५

एकमेकींच्या मताला 'हो' म्हणता
समज जपता होई न कधी गुंता ---- ६

'' होतीस ना कधीतरी तू सूनबाई
होशील ना कधीतरी तू सासूबाई '' ---- ७

जाणीव हीही हृदयी जपुनी धरावी
सुखदु:ख एकमेका समजून घ्यावी ---- ८

✻ समाधान ✻

गृहलक्ष्मी जेथे प्रसन्न तेथे
राहील शांती वसतीस तेथे ---- १

अनंत असती राशी सुखाच्या
साऱ्या न सकला मिळावयाच्या ---- २

रहस्य जरि हे समजून घेता
चित्ती समाधाना काही न तोटा ---- ३

दुसऱ्याशी तुलना कधी ना करावी
पदरी पडे त्या तृप्ती असावी ---- ४

आचार अपुला असा असावा
आदर्श ज्याचा सकलांनी घ्यावा ---- ५

खुर्ची ही अपुली खाली करावी
जागाही थोडी इतरांस द्यावी ---- ६

नवासनी ही सुखी असावे
गतस्मृतींना मनी ऊजळावे ---- ७

संसार पुढल्या पिढीचा पहावा
डोळयात आनंद भरुनी वहावा ---- ८

माझे हे माझे कधी न वदावे

ईशाच्या चरणी तल्लीन व्हावे ---- ९

चुकलेल्या कार्या क्षमा करावी
गतकार्ये इतिहासजमा करावी ---- १०

फुलापरी हे आयुष्य अपुले
ठाऊक नाही किती आखलेले ---- ११

अपुल्या हाती नाही त्याचीही दोरी
बसला असे तो वरती मुरारी ----१२

वदते न माझ्या मनिचे हे काही
मुखी नित्य माझ्या सखा तोच राही ----१३

(राहीसखा = पांडुरंग)

✲ माऊली ✲

देवाजीने आज खरी हाक माझी ऐकली
सोनुल्यांनो, तुमच्यामुळे धन्य मीही माऊली ---- ॥

चांदण्यांची फुले सांगू किती म्हणुनि वेचली
काट्यांचीही गुलाबाच्या फुले जणू जाहली
तृप्ती माझ्या संसाराची आज खरी जाहली
सोनुल्यांनो, तुमच्यामुळे धन्य मीही माऊली ---- १

सुखाची ही रास माझ्या अंकी जणू उतरली
रामकृष्ण जोडी जणू अवनी अवतरली
वैद्यराजकृपेमुळे देवभेट जाहली
सोनुल्यांनो, तुमच्यामुळे धन्य मीही माऊली ---- २

तुमच्यामुळे राजसांनो, सृष्टी माझी बदलली
दृष्ट तुमची काढण्याला सृष्टी शालु ल्यायिली
स्वागताला तुमच्या सारी सजुनि सिध्द जाहली

सोनुल्यांनो, तुमच्यामुळे धन्य मीही माऊली ---- ३

कृष्णदेवरायाचीही मुरली जणू ऐकली
द्रौपदीची थाळी माझ्या हाती आज गवसली
नाती–गोती सारी माझ्या मदतीला धावली
सोनुल्यांनो, तुमच्यामुळे धन्य मीही माऊली ---- ४

माय माझ्या माऊलीची स्वप्नी मला भेटली
अमृताची वेल तिने तुमच्यासाठी धाडली
याद तिची येई मजला आज पावलोपावली
सोनुल्यांनो, तुमच्यामुले धन्य मीही माऊली ---- ५

देवाजीही अला घरी बाळरुप घेऊनी
कौतुकाने पाहते मी त्याला डोळे भरूनी
एकसमयी सूर्य–चंद्र–उदय माझ्या सदनी
सोनुल्यांनो, तुमच्यामुळे धन्य मीही माऊली ---- ६

## * सुमनांजली *

सासुश्वशुर कधि न झाले
असती आपणासारखे
वडिलधाऱ्या आम्ही शब्दा
जाहलो हे पारखे ---- १

मातपित्यासम ही दिधली
प्रीती आम्हा सकलास
लेकी म्हणूनी वागविले
कधी न हो सासुरवास ---- २

लेकरांच्या सुखासाठी
यातनाही भोगल्या
मुखावाटे परि न उमटे
शब्द कधिही आपुल्या ---- ३

चार पुत्रांपरिस असती
चार लेकी आपुल्या

फुले येती नेटकीशी
वेलीवरती सानुल्या ---- ४

छत्र आपले दिवस काही
आणखी जरि लाभते
नवीन नातू पणतू पणती
पाहण्या हे साधते ---- ५

रोपट्याच्या शाखा इवल्या
गेल्या आता दुरवरी
पाहण्या त्या उभयतांनी
यावे आपण झडकरी ---- ६

उठत बसता काम करता
स्मरण आपुले नित्य होते
अश्रु भरती नयनी माझ्या
मनही ऐसे भरुनी येते ---- ७

सुख मिळे जे आज आम्हा
खरी कृपा ही आपुली
स्मरण त्याचे ठेवुनीया
वाहते ही सुमनांजली ---- ८

## * सुवर्णपट *

संसाराचा सुवर्णपट हा कधी न द्यावा उधळोनी
दान कसेही पडले तरीही घ्यावे सकला समजोनी ---- १

पेला अर्धा रिकामा ही खंत करावी कधी न मनी
पेला अर्धा भरलेला हे सूखचि राही भरुनी मनी ---- २

झाले गेले विसरुनी जावे पुढील पाना उलटोनी
नशीबवान हो खरेच आपण नरजन्मा आलो म्हणुनी ---- ३

टाकीचे ते घाव सोशिता देवत्वचि ये दगडाला

सजीव आपण त्यातुन माणुस उणे कुठे मग पुण्याला ---- ४

अर्धनारी त्या नटेश्वरापरि संसारचि तो असे खरा
थोडे इतरा समजुनि घेता रोजचि येई तो दसरा ---- ५

रोजचि दसरा घरात असता आनंदा नाही तोटा
दुसऱ्यासाठी झिजता झिजता चंदनगंधही ये मोठा ---- ६

सदा करावा विचार अपुल्या पुढील पिढीचा तोच भला
हेवेदावे पार पुसोनी मदत करू त्या तरायला ---- ७

आकाशीच्या देवाघरची फुलेच असती अपुली मुले
सुंदर सोज्वळ संस्कारांनी सजवू तयांचे मधुर झुले ---- ८

सुजाण आपण आहात सारे ठाऊक आहे जरि मजला
दोन शब्द हे सांगितल्याविण राहवते ना परि मजला ---- ९

✲ शेजीबाई ✲

पहाटे उठोनी स्वयंपाकपाणी
करोनी कॉलेजला शिकवाया जाई
भर दुपारी परतुनी येई
अशी माझी शेजीबाई ---- १

टापटीप अन कलाकुसरी
साऱ्यांची तिला आवड भारी
सदा हासरी आणि गोजिरी
अशी माझी शेजीबाई ---- २

नातीगोती सांभाळी सारी
आल्यागेल्याचे कौतुक करी
सासरमाहेरा आवडी होई
अशी माझी शेजीबाई ---- ३

कामाधामात बुडुनी राही
कंटाळा शब्द कोशात नाही

आजच्या काळाची आदर्श नारी
अशी माझी शेजीबाई ---- ४

✻ तुळस ✻

घर तसं मोठ्ठं
भर वस्तीत छानसं
आल्या गेल्या पाहुण्यालाही
वाटे खूप रहावसं ---- १

एक नाही दोन नाही
खोल्या दहा बारा
प्रत्येक खोलीचाच
स्वागतशील उंबरा ---- २

भल्या पहाटे सकाळी
दारी सजते रांगोळी
स्वागताला तयार जणू
कुंकुमतिलक लेऊन भाळी ---- ३

देव–धर्म पूजा–अर्चा
सारे कसे शिस्तीने
सणवार होती अगदी
पूर्वीच्याच पध्दतीने ---- ४

कित्ती काम केले तरी
आठी नाही कपाळी
गालावरती सदैव फुलते
तीच ती गोड खळी ---- ५

केव्हाही जा तिथं तुम्ही
भर दुपारी उन्हात
स्वागत होईल नेहमीच तुमचं
हसू लेऊन गालात ---- ६

संसाराच्या हिंदोळ्यावर
झोके घेता घेता
गळयातल्या कोकिळेला
सवड नाही आता ---- ७

लहान थोर पै–पाहुणे
साऱ्यांनाच जपणारी
हसऱ्या अंगणी शोभून दिसते
तुळस जणू मंजिरी ---- ८

## ✻ शुभाशीश ✻

तुम्ही प्राणदाते तुम्ही रोगहर्ते
उपकारकर्तेही साऱ्या जनाते
म्हणुनीच स्मरते जग हे तुम्हाते
शुभाशीष तुम्हा आजी आज देते ---- १

जोडूनि द्या मोडलेल्या हाडाते
मंजूळ बोलून रोगीजनाते
आशीर्वचा घ्या तुम्ही दोन्ही हाते
शुभाशीष तुम्हा आजी आज देते ---- २

जन सारे स्मरती धन्वन्तरीते
विश्वास तुमच्यावरी ठेविती ते
यश तेवि तुमच्या हातास येते
शुभाशीष तुम्हा आजी आज देते ---- ३

केले बरे तुम्ही मजसारखीते
फडकावुनी द्या गगनी ध्वजाते
तव कीर्ती पसरो दिगंतराते
शुभाशीष तुम्हा आजी आज देते ---- ४

## * आनंदाचा मळा *

यशस्वितेचे रहस्य अपुल्या
कळले हो आज ऽ ऽ ऽ
पथप्रदर्शी ठरेल आम्हा
अपुला ग्रंथराज ---- १

अनुभवियेले प्रसंग असती
आपण जे नाना ऽ ऽ ऽ
गणती त्यांची करण्या अमुची
मतीही चालेना ---- २

कष्ट करोनी आनंदाचा
मळाच फुलवियला ऽ ऽ ऽ
सुगंध त्याचा सर्वदूरही
पसरूनिया गेला ---- ३

आपणासरसे मातपिता हे
कुणास ना मिळती ऽ ऽ ऽ

भागयवान ते आम्ही वाटे
खरेच या जगती ---- ४

ठाऊक नव्हते जे जे आम्हा
ग्रंथी या कळते ऽ ऽ ऽ
वाचुनी ते ते पाणी अमुच्या
डोळा ना खळते ---- ५

गतकालाते उकलूनी वाटे
दाखविले द्वार ऽ ऽ ऽ
स्वीकारावा त्रिवार अमुचा
तुम्ही नमस्कार ---- ६

✼ आभाळपोकळी ✼

गोजिरवाणे रूप तुमचे
मनी भरूनी राही
तुमच्यासाठी सदा आमुचा
कंठ दाटुनी येई ---- १

बकुळफुलापरिस असती
आठवणी साऱ्या
मनात घर करून राहती
जशा सोनपऱ्या ---- २

सगेसोयरे सतत सारे
असती भोवती
परि तुमच्या आठवणींना
नसे कधी क्षिती ---- ३

देवापुढती जशा तेवती
समईमधल्या ज्योती
तशा घालवू आम्ही सारे
दिवस आणि राती ---- ४

आभाळीच्या पोकळीची
जीवनी जाणीव होई
भरूनी तिजला काढायाला
जगती शब्दचि नाही ---- ५

✼ मराठी माऊली ✼

माझी मराठी माऊली
साऱ्या जगाची सावली
घरी गं माझ्या आली
माझी मराठी माऊली ---- १

शालू सखूचा ल्यायिली
पैठणी बहिणाई आणिली
साऱ्या जगी देखणी
माझी मराठी माऊली ---- २

चोळी जनीच्या हाताची
जरी मुक्तीच्या काठाची
अंगी मऊ मखमली
माझी मराठी माऊली ---- ३

हार नाम्याने घातला
गजरा सावत्याने माळिला
पैंजण नाथा घाली
माझी मराठी माऊली ---- ४

चुडा तुक्याने भरविला
मुकुट ज्ञान्याने चढविला
सकला हाती धरी
माझी मराठी माऊली ---- ५

गजर करिती वारकरी
जमती विठूच्या नगरी
पंढरी खरी दुमदुमली
माझी मराठी माऊली ---- ६

माझी मराठी माऊली
गंगा ज्ञानाची जाहली
दिगंतरासि निघाली
माझी मराठी माऊली ---- ७

* पूर्ती *

प्रत्येक कविता होताना
मनात एक सणक असते

तिची पूर्ती होईतो
मनात थैमान चालू असते ---- १

सागराच्या लाटांपरी
कल्पनांचे तरंग उमटत असतात
चराचराचे रूप घेऊन
डोळयांसमोर नाचत असतात ---- २

इतरांना काही वाटले तरी
एक अनामिक खुशी असते
वाऱ्यावर स्वार होऊन
मन स्वैर भटकत असते ---- ३

## * तीच *

घराच्या सुखासाठी
प्राण वेचते
तीच खरी वनिता ---- १

काठावरच्या लोकांचे
जीवन फुलवते
तीच खरी सरिता ---- २

मनाच्या गाभाऱ्यातून
जन्म घेते
तीच खरी कविता ---- ३

## ✼ प्रतिमा ✼

जिकडे पहावे तिकडे मजला
काव्य काव्य अन् काव्य दिसे
काय करावे उमगत नाही
वाटे मज लागले पिसे ---- १

स्वच्छंदी या वाऱ्यासंगे
होउनि मयूरपंखी पिसे
मन हे माझे लहरत जाई
ठाऊक नाही कुठे कसे ---- २

पुनवेच्याही राती चांदण्या
चंद्र नभीचा तो विलसे
पाहुनि त्या सागरास वाटे
चांदा भेटू कुठे कसे ---- ३

उत्तुंग रुपेरी हिमालयाचे
भव्य रुप ते सुंदरसे
हिरव्या मखमली तृणावरीही
मन माझे अडकून बसे ---- ४

चराचरातील विविध छटामधि
परमेशाचे रूप दिसे
मनात माझ्या प्रतिमा त्याची
रूप घेऊनि बसलीसे ---- ५

## ✼ स्पर्श ✼

तव हस्ताचा स्पर्श लाभता
शब्द घे तव माधुरी
मधुरतेसवे अर्थ हा करी
अमृताची बरोबरी

शब्द–अर्था जोड जैशी
नववधू जणू लाजरी
कृष्णकन्हैय्या हाती शोभे
हासरी जणू बासरी ––––१

तव हस्ताचा स्पर्श लाभता
शब्दास ये नव पल्लवी
झिरमिरी ह्या सोनपदरी
अर्थ नूतन साठवी
सौंदर्याचे दर्शन जगता
उकलुनि परि तो दाखवी
कृष्णकन्हैय्या हासुनि दावी
आपुली ही छबी नवी –––– २

तव हस्ताचा स्पर्श लाभता
शब्दास ये नव रूपडे
विविधरंगी अर्थछटांचे
प्रथमदर्शनी कूट पडे
लक्षपूर्वक पाहता नव
अर्थ त्यातुनि उलगडे
कृष्णकन्हैय्या अंगी शोभे
सानुले जणू अंगडे –––– ३

## ✻ पुसू नको ✻

पुसू नको गं सखे मला तू कविता स्फुरते कशी ?
ठाऊक नाही मला परी जणू रंभा की उर्वशी
नाचत मुरडत अलगद येती स्वर्गलोकीच्या पऱ्या
कुंद अबोली जाईजुईच्या कळया जणू साजिऱ्या ––––१

पुसू नको गं सखे मला तू कविता की ही फुले ?
ठाऊक नाही मला परी जणू झोपाळा हा झुले
पहाटसमयी पारिजात हा मंदमंदसा डुले
गोजिरवाण्या गोविंदाची दुडदुडती पाऊले –––– २

पुसू नको गं सखे मला तू कविता की आरती ?
ठाऊक नाही मला परी जणू समईच्या ह्या ज्योती
वेणू घरी हा सखे श्रीहरी नाजुकसाजुक ओठांवरती
बासरीतुनी घननीळाच्या सूर जणू उमलती ---- ३

✻ कविता ✻

कवितेला वास माझ्या
येतो साधेपणाचा
कवितेचा बाज माझ्या
खेडवळी वळणाचा ---- १

कवितेचा रंग माझ्या
साध्या सदाफुलीचा
कवितेचा संग माझ्या
मायेच्या माऊलीचा ---- २

कवितेचा नूर माझ्या
शब्दांमधल्या टिंबांचा
कवितेचा सूर माझ्या
मनातल्या प्रतिबिंबांचा ---- ३

कवितेचा अर्थ माझ्या
शब्दांच्याही पलिकडचा
कवितेचा आवर्त माझ्या
परमेशाच्या प्राप्तीचा ----४

✻ कवितासखी ✻

सोडुनी मजला जाऊ नको तू
बाई सखये कविते
ओळखीस नच झाले असती
दिवस चारही पुरते ---- १

संगतीत तव उडुनी जाती
क्षण किती मज ना कळते
साद घालता कैसी येशी
कोडे ना उलगडते ---- २

अवीट ऐशा तुझ्या सोबती
माझी मी नच उरते
समाधीत तव असता मीही
भान जगाचे नुरते ---- ३

भरजरी हा तव रेशिमशेला
पाहून मन हे खुलते
पेलवेल का परि हे मजला
ओझे असले भलते ---- ४

मातेपरि तू पाखर घाली
म्हणो काहीही जग ते
कसलीही मग भीती माझ्या
मनामधे ना उरते ---- ५

## * वेलीवरची फुले *

अनंत असती वेलीवरती
जाईजुईची फुले
परि ठाऊक नाही नशिबी कुणाच्या
काय असे लिहिले ---- १

कितीक येती आणि जाती
कुणास ना दिसती
परि सुगंध अपुला जगास देण्या
अविरत धडपडती ---- २

फूलपाखरी पंख लेऊनी

वाऱ्यासंगे भिरभिरती
कुणी देवाच्या चरणावरती
पायी कुणी तुडविती ---- ३

अवचित कोणी जाऊनी पडती
विष्णूपदाचे वरी
अलगद कोणी शोभुनी दिसते
केशकलापावरी ---- ४

आकाशीच्या तारकांपरि
वेलींवरती फुलायचे
परि ठाऊक नाही कधी कुणाला
कुठे कसे जायचे ---- ५

जीवन अपुले दोन क्षणी जणू
अळवावरचे पाणी
करी तयाचे सोने तर कुणी
वाळूवरची गाणी ---- ६

## ✻ भल्या पहाटे ✻

भल्या पहाटे अंधारी
सूर्यदेवाच्या मंदिरी
शालू नेसून अंजिरी
उषा येई ---- १

भल्या पहाटे पहाटे
सूर्यदेवा पाहू वाटे
कोंबड्याच्या मुखावाटे
संतवाणी ---- २

भल्या पहाटे सकाळी
सूर्यदेवाच्या राऊळी
पक्षी गाताती भूपाळी

आनंदाने ---- ३

भल्या पहाटेच्या क्षणी
सूर्यदेवाच्या चरणी
वृक्षवेली आनंदोनी
लवताती ---- ४

भल्या पहाटे उठोनि
सूर्यदेवाला नमुनि
सर्वांसाठी चहापाणी
माय करी ---- ५

## ✼ पावसा रे पावसा ✼

पावसा रे पावसा तू असा रे कसा
आमच्या वरती रुसलास जसा
जप तुझा करून कोरडा पडला घसा
लवकर ये जसा असशील तसा ---- १

वाट तुझी पाहून आमचे शिणले डोळे
तुझ्याविना चातकही इथे तळमळे
तुझ्यासाठी जीव आमचा तिळ तिळ उले
तुझ्याविना झालो आम्ही सारे खुळे ---- २

साऱ्यांचे हाल काही पाहवेना
हाय हाय ऊन  काही साहवेना
ढगातले पाणी खाली येईना
डोळ्यातले पाणी काही जाईना ---- ३

भेटीसाठी तुझ्या काही नाही घासाघीस
भेट तुझी होता ना वाटे बासबीस
भेटीसाठी तुझ्या होतो जीव कासावीस
भेट तुझी होता जणू फिरे मोरपीस ---- ४

### ✻ बाग ✻

बागेतल्या फुलांची एकच गर्दी
फुलांनी भरुन गेली परडी ---- १

गुलाबाच्या फुलाचा तोराच भारी
तुळशीची मंजिरी जणू नाजुक नारी ---- २

मोगऱ्याच्या फुलाची ऐटच बाई
पण जुईच्या कळीची सर त्याला नाही ---- ३

हिरव्या चाफ्याचा नखराच मोठा
पिवळया चाफ्याला नाही काही तोटा ---- ४

जास्वंदी कर्दळी भाव खाऊन जाई
लाल–पिवळी गुलबाक्षी गोड हसून पाही ---- ५

पांढरी शुभ्र ब्रम्हकमळे क्वचितच येती
पारिजाताच्या फुलांना नाही काही गणती ---- ६

गेंदेवाल्या झेंडूचा दिमाखच भारी
ऐटदार शेवंतीची रीतच न्यारी ---- ७

तू–तू मैं–मैं नका करू मारामारी
सारीच आहेत देवाला प्यारी ---- ८

### ✻ याद ✻

स्वप्नी धुंद होताना
पहाटपक्षी गाताना ---- १

सनईचे सूर ऐकताना
गुलाबी थंडी लपेटताना ---- २

शुभ्र धुक्यात हरवताना
रिमझिम पावसात भिजताना ---- ३

मऊशार गवती चालताना
चांदण्याची फुले वेचताना ---- ४

झोपाळ्यावर झुलताना
मनातल्या मनात फुलताना ---- ५

देवाचे नाव घेताना
कामात गुंग असताना ---- ६

हमखास तुझी याद येते
अन् ओल्या आठवणीत विरून जाते ---- ७

## ✲ झुळुक ✲

वाऱ्याची छोटीशी आली झुळुक
पाने वाजली सुळुक् सुळुक् ---- १

कोवळी पाने गोडशी हासली
हिरवी पाने थोडीशी लाजली ---- २

पिवळी पाने मात्र शहारली
अन् झाडाखाली गळून पडली ---- ३

पानांचा झाला चक्काचूर
झाडापासून गेली दूरदूर ---- ४

## ✲ संदेश ✲

साहवेना बाई मला
शिशिरातील पानगळ
पेलवेना डोईवरी
भलेथोरले आभाळ ---- १

ग्रीष्मातली हाय हाय
कशी काय सांगू माय
सांगून तुला कध्धी खरं
वाटायचं नाही बरं ---- २

शरदाच्या चांदण्याची
रीतच न्यारी
मनाच्या चोरकप्प्यात
अलगद उतरी ---- ३

वर्षाऋतूत बरसतात
सरीवर सरी
हात गुंफून हातात
कोसळती जरी ---- ४

दिवस कसा सरतो
कळत मला नाही
तुझ्या सयीशिवाय
घास उतरत नाही ---- ५

मेघराजा संदेशाला
नीट ठेव ध्यानात
दूर माझ्या माईच्या
जाऊन सांग कानात ---- ६

## ✻सांगता ✻

पैलतिरी ते बिंब उलटता
संध्याराणी लाजुन बघता
रंगांची ती उधळण होता

लालगुलाबी रंग ही जमता ---- १

रंगांचे धन तिथे उधळता
कड सोनेरी ढगास मिळता
रंगधनूचे दर्शन होता
रंगुनी जाई धरणी माता ---- २

गाई परतुनी घरासि येता
देवापुढती दिवा लावला
'शुभं करोति' म्हणता म्हणता
अंधाराचे नावही नुरता ---- ३

घरधनी अपुल्या घरास येता
हसऱ्या वदनी दिसे धन्यता
श्रमसाफल्या होई तत्वता
दिवसाची ती होई सांगता ---- ४

## ❊ गंगामाई ❊

जगी असती ते बहुत नदी-नाले
परी सकला ना एक नाव चाले ---- १

पुण्यदायी ती एक खरी गंगा
दुजी नाही तिजपरी जगी सांगा ---- २

सकल पापे ती सुखे घेई पोटी
क्षमा सकलांना करुनी होई मोठी ---- ३

चूक नसताना आपुली जरी काही
क्षमा करता त्या देव वरुनी पाही ---- ४

सजा पाप्याला देव खरी देई
सदा आठवावी मनी गंगामाई ---- ५

### ✻ चांदणं ✻

पुनवेचं चांदणं गगनात
अन् प्रकाश पडलाय दरियात
चांदणं आयलय हातात
अन् लाज वाटे मला बाई मनात ---- १

चंदेरी मासोळी आली पाण्यात
अन् गोड गोड खळी माझ्या गालात
गवसली गं माझ्या जाळयात
अन घेऊन निघाले मी तोऱ्यात ---- २

समिंदरा रे समिंदरा
घेऊन चल मला माझ्या घरा
जाईन मी लाटांच्या संगतीत
अन् वाळूत पावले रेखीत ---- ३

### ✻ भेट ✻

दिवस व रात्र पळत असतात
            एकमेकांच्या पाठोपाठ
भेटण्याचा करतात प्रयत्न
            अेकमेकांना आटोकाट ---- १

प्रेमाने ओसंडून वाहत असतात
            मने त्यांची काठोकाठ
मनातल्या मायेत चिंब भिजून
            धावत सुटतात बिनबोभाट ---- २

जन्मजन्मांतरीचे सोबती पण
            भेट नाही वास्तवात
कळत नकळत एकच गाणे
            भेटीचे ते गात असतात ---- ३

## ✼ एक क्षण ✼

एक क्षण असा येतो –
स्वप्नाळलेल्या भावनांना
शब्दरूप देऊन जातो ---- १

एक क्षण असा येतो –
मरगळलेल्या मनावर
श्रावणाचा शिडकावा करून जातो ---- २

एक क्षण असा येतो –
दुखावलेल्या दिलाला
सुखाचा दिलासा देऊन जातो ---- ३

एक क्षण असा येतो –
ओथंबलेल्या आसवांचे
ओझे हलके करून जातो ---- ४

एक क्षण असा येतो –
करपलेल्या कातळालाही
हलकेच पाझर फोडून जातो ---- ५

एक क्षण असा येतो –
पुन्हा कधी न येण्यासाठी
जीवनमुक्त करून जातो ---- ६

* ठाऊके ना *

गोड गोड पाणी नारळालागूनी
येई कोठूनी ठाऊके ना ---- १

इवलीशीशी चिमणी गाई गोड गाणी
शिकविली कोणी ठाऊके ना ---- २

आकाशीच्या अंगणी चमके जी चांदणी
कैसी येई झणी ठाऊके ना ---- ३

कातळाला कोणी पाझर फोडोनी
काढीतसे पाणी ठाऊके ना ---- ४

संपता रजनी जाग स्वप्नामधुनी
कैसी ये नयनी ठाऊके ना ---- ५

जैसी ज्याची करणी तैसी असे भरणी
कधी ये सदनी ठाऊके ना ---- ६

सज्जनांच्या वदनी साखरपेरीवाणी
घातलीसे कोणी ठाऊके ना ---- ७

नामयाची जनी पांडुरंगचरणी
रंगे कैसी भजनी ठाऊके ना ---- ८

तैसी माझे मनी कवितासाजणी
कैसी ये नटूनी ठाऊके ना ---- ९

* काकू बाई *

शेजारच्या काकू
घाईघाईने उठल्या
सकाळच्या प्रहरी
व्यायाम करु म्हणाल्या ---- १

'होय–नाही' म्हणता म्हणता
कपभर चहा प्यायल्या
''राहू दे बाकीचा
आल्यावर घेऊ'' म्हणाल्या –––– २

जामानिमा आवरून
चपला सरकवल्या
सहाचे ठोके ऐकताच
''येते हो'' म्हणाल्या –––– ३

झपाझप पावले टाकीत
काकूबाई निघाल्या
पण पाच–दहा पावलातच
गळाठून गेल्या –––– ४

''आज पुरे. उद्या बघू ''
काकू पुटपुटल्या
अन् कशाबशा धापा टाकीत
घरापर्यंत आल्या –––– ५

✻ बोल बोलता ✻

घड्याळाचा काटा सरकतो  कधी
कळत नाही बघता बघता
अचानकपणे ठसका लागतो
न कळत जेवता जेवता –––– १

हॅलो, हाय–फाय म्हणावे लागते
घाईमध्ये असता असता
देखल्या देवा हात जोडतो
नकळत जाता जाता –––– २

मनातल्या मनात हसू येते
पु.लं. चे लिखाण वाचता वाचता
डोळयामध्ये आसू भरती
नकळत हसता हसता –––– ३

भली मोठी जांभई येते
बोअर कविता ऐकता ऐकता
झोपेतून जाग अलगद येते
पहाटपक्षी गाता गाता –––– ४

क्षणात ऊन क्षणात पाऊस
श्रावणमासी बघता बघता
ज्याचा तोही उरत नाही
आठवडोही बुडता बुडता –––– ५

देवाचे नाव मनोमन घ्यावे
काम करता उठता बसता
ठाऊक नाही संपेल कधी
जीवन आपले बोलबोलता –––– ६

## ✻ आभाळमन ✻

दुसऱ्याला चांगले म्हणायला
आभाळाएवढे मन लागते
विद्येच्याही जोडीला
संस्काररूपी धन लागते –––– १

अनमोल हिऱ्यालाही
सुवर्णाचे कोंदण लागते
नुसती ऐश करायलाही
खिशामध्ये छन्छन् लागते –––– २

उच्च ध्येय गाठायचे तर
मनाशी खूण बांधावी लागते
सुख हवे असेल तर
दुःख पचवून टाकावे लागते –––– ३

परमेशाच्या प्राप्तीला
भक्तीत रंगून जावे लागते

पांडुरंगाच्या भेटीला
संसार सोडून जावे लागते ---- ४

* मनात *

मनात येई कधीमधी
काहीतरी लिहावे
मनातल्या विचारांना
फुलपाखरांचे पंख द्यावे ---- १

मनात येई कधीमधी
पक्ष्यांपरी उडावे
आभाळातील स्वच्छंदी
पाखरांशी हितगुज करावे ---- २

मनात येई कधीमधी
चातकापरी असावे
परमेश्वरी कृपादृष्टीच्या
एका थेंबाने तृप्त व्हावे ---- ३

मनात येई कधीतरी
माणसातील अंतर दूर व्हावे
माणसाने माणसाशी
माणसापरी वागावे ---- ४

मनात येई कधीतरी
निसर्गाच्या कुशीत शिरावे
अन् परमेशाच्या रूपात
विलीन होऊन जावे ---- ५

मनातल्या साऱ्या विचारांना
देण्या स्वरूप मूर्त
मला वाटते तूर्त
माणूस आहे असमर्थ ---- ६

✻ सन्मती ✻

अरे अरे माणसा –

आयुष्यभर जपत आलास
स्वत:च्याच मताला
एकदा तरी द्यावी म्हणते
किंमत दुसऱ्याच्या मनाला ---- १

आयुष्यभर वाजवत आलास
स्वत:चीच टिमकी
एकदा तरी म्हणते मी
दुसऱ्याचं ऐकावं की ---- २

आयुष्याच्या अंतिम टप्प्यावर
येऊन पोहोचल्यावरती
एकदा तरी बोल म्हणते
मान घालून खालती ---- ३

आता सारी भिस्त आहे
त्या विठूरायावरती
तोच देवो सर्वांना
थोडी तरी सन्मती ---- ४

✻ पलिकडले ✻

पूजा–अर्चा मंदिर–मूर्ती
यांच्याही पलिकडे असते
देवाचे देवपण ---- १

खिडक्या–दारे  माती–भिंती
यांच्याही पलिकडे  असते

घराचे घरपण ---- २

नाक–डोळे रंग–रूप
यांच्याही पलिकडे असते
माणसाचे माणूसपण ---- ३

रांधा–वाढा उष्टी–काढा
यांच्याही पलिकडे असते
गृहिणींचे अंगण ---- ४

कपडा–लत्ता दाग–दागिने
यांच्याही पलिकडे असते
स्त्रीचे आईपण ---- ५

## * शिक्षण *

माणसा रे माणसा,
शिकायचे असेल तर
एवढेच शीक–
सुंदर सुरेल पक्षांच्या
गळयामधली तान शीक ---- १

माणसा रे माणसा,
शिकायचे असेल तर
एवढेच शीक–
गुणगुणणाऱ्या भुंग्याकडून
गुणांचे गुणगान शीक ---- २

माणसा रे माणसा,
शिकायचे असेल तर
एवढेच शीक–
मिणमिणणाऱ्या पणतीकडून
सर्वस्वाचे दान शीक ---- ३

माणसा रे माणसा,

शिकायचे असेल तर
एवढेच शीक–
झुळझुळणाऱ्या झऱ्याकडून
जीवनाची जाण शीक ---- ४

माणसा रे माणसा,
शिकायचे असेल तर
एवढेच शीक–
साधुसंतजनांकडून
परमेशाचे ध्यान शीक ---- ५

✻ स्वप्नात ✻

गुंतले हे मन माझे
तुझ्या केशपाशावरी
कसे आवरू हे मन
सल बोचते ही उरी ---- १

खोल जखम उरीची
कशी कुणाला गे सांगू ?
जखमेत जळून गे
मन लागते दुभंगू ---- २

केशपाशाने ग तुझ्या
ठेव बांधून मजला
ऊन उतरले अंगी
जीव होई सोनसळा ---- ३

मनमोराचा पिसारा
फुलेल का कधीतरी ?
निवेल हे मन माझे
तृप्त होईन अंतरी ---- ४

नाही सफल जाहले

नाते आपुले सत्यात
पण चुकवू नको गं
भेट आपुली स्वप्नात ---- ५

✻ सुवर्णाक्षरे ✻

नारी किंवा नरही असो त्या
नियम एकचि अखिल जगी
रंक असो वा राव असो वा
अमर न कोणी सकल जगी ---- १

जाणीव ही ही ठेवावी रे
तुवा मानवा म्हणुनी मनी
वर्तन ऐसे ठेवावे की
सजगपणाने जपुनी जनी ---- २

धनुष्यातुनी सुटलेला तो
बाण परतुनी ये न कधी
वदनामधुनी नि:सरलेला
शब्द न परतुनी येई कधी ---- ३

रविशशीचे किरण न करती
रंकराव हा भेद कधी
सर्वांभूती तैसी तूही
ठेवी मानवा समबुध्दी ---- ४

अपुल्यासरशा सूज्ञ जनाप्रती
उपदेशा ना मी केले
ठाऊक आहे सकल जना तरी
सुवर्णाक्षरी गुंफियले ---- ५

## ✻ सोपे आणि अवघड ✻

तोडणे सोपे जोडणे अवघड
बोलणे सोपे करणे अवघड ---- १

घेणे सोपे देणे अवघड
येणे सोपे जाणे अवघड ---- २

तरणे सोपे तारणे अवघड
स्विकारणे सोपे नाकारणे अवघड ---- ३

पेरणे सोपे जोपासणे अवघड
ऐकणे सोपे ऐकवणे अवघड ---- ४

वाचणे सोपे लिहिणे अवघड
जगणे सोपे जगवणे अवघड ---- ५

## ✻ घर ✻

महाल झोपडी बंगला फ्लॅट
प्रत्येकाचा निराळा थाट ---- १

प्रत्येकाची आपापली शान
नाही मोठे नाही सान ---- २

ज्याचं त्यालाच घर प्यारं
बोलक्या भिंती हसरी दारं ---- ३

दुसऱ्याचे घर दुरूनच बरे
स्वत:च्या घरातच सुखाचे वारे ---- ४

दगड माती निर्जीव पसारा
त्यातच लाभे मायेचा उबारा ---- ५

## ❇ शेतकरी ❇

आम्ही शेतकरी कामकरी
शेताची लेकरं, काळ्या आईची लेकरं
करनार काम, गाळनार घाम
समद्यांच्या फुडं जानारं, जगाच्या फुडं जानारं ---- १

ढवळ्या नि पवळ्या आमचे
शूर सरदारं आमचे शूर सरदारं
त्यांच्या पायी आहे आमची
खरी मदारं आमची खरी मदारं ---- २

शूर आमच्या सरदारंची
गानी गानारं, आम्ही पवाडे गानारं
करून काम सुखाचा मग
घास खानारं, आम्ही घास खानारं ---- ३

नांगराला धरता धरता
साळा शिकनारं, आम्ही साळा शिकनारं
शेतकीच्या पदवीबिगर
न्हाई ऱ्हानारं, आम्ही न्हाई ऱ्हानारं ---- ४

बक्कळ धान्य पिकवून आम्ही
समद्यांना देनारं,आम्ही समद्यांना देनारं
जनतेची आम्ही बी
सेवा करनारं, आम्ही सेवा करनारं ---- ५

### ✻ नक्को नक्को ✻

बोलावल्याविणा जाऊ नको
अन् विचारल्याविणा सांगू नको
कुणास काही मागू नको
अन् दुःख कुणाला सांगू नको ---- १

दोघात तिसरा बोलू नको
अन् वेडावाकडा चालू नको
पैशाची ती हाव नको
अन् सरड्याची ती धाव नको ---- २

कोणासंगे भांडू नको
अन् वितंडवादा घालू नको
उगा कुणाला हसू नको
अन् थोड्यासाठी रुसू नको ---- ३

आपुली टिमकी वाजवू नको
अन् फुकटची दमडी घेऊ नको
अधीक सलगी धरू नको
अन् नात्यातली मुलगी करू नको ---- ४

अतिगोडाते खाऊ नको
अन् सदासर्वदा झोपू नको
वेळ रिकामा दवडू नको
अन् नामस्मरणा विसरू नको ---- ५

### ✻ शतकसम्राट ✻

अक्षरवाङ्मयदालन आम्हासाठी केले खुले
विखरुनी पडती सुविचारांची गोजिरवाणी फुले ---- १

सुंदर सोज्वळ उपमांना ना नसे कधी खीळ
स्फूर्तीची मनि उसळे उर्मी नसे पोरखेळ ---- २

नाजुकहाती बकुळफुलांचा शोभे जणू हार
प्रसन्न चित्ती प्रवेश करता हासे जणू दार ---- ३

साहित्याच्या परिमलासवे डुले मोरपीस
जगी जन्मले अमर जाहले खांडेकर वि.स.---- ४

शतकाच्या ह्या सम्राटा, तू प्रणाम अमुचे घेई
शुभकार्या परि करण्या सकला स्फूर्ती तू देई ---- ५

* मेघदूत *

साहित्याच्या सम्राटा तू प्रणाम घे अमुचा
कालक्रम जरि तुझा कुणाला नसे ओळखीचा
प्रसन्नचित्ते सरस्वती तुज देई दिव्य वाचा
अलौकिकाचा स्पर्शही लाभे तव काव्या साचा ---- १

तीन नाटके काव्ये चारही ऐसी सप्तपदी
प्रसिद्ध झाली काव्यसंपदा कालिदासहाती
‘मेघदूता’सम ना मिळते काव्यकृती दुसरी
कविकुलगुरु हे सकलजनांचे नमना स्वीकारी ---- २

प्रतिबिंबचि ते निसर्गातले काव्यी अवतरले
कालिदासमनभावसागरी तरंग जणू उठले
शृंगारासम करूणरसाचे दर्शन त्यात घडे
काव्यकृतीही शोधुनी ऐसी कुठेचि ना सापडे ---- ३

यक्षाला त्या सदैव लागे प्रियेचाच ध्यास
मूर्ती तियेचि नयनापुढती उभी असे खास
रामगिरीहुनी अलकापुरीला मेघा जाण्यास
शापभ्रष्ट तो यक्ष देतसे प्रियेस संदेश ---- ४

* अमेरिका *

विमानातल्या प्रथमप्रवासी अमेरिका गाठले
परि मातृभूमीला स्वप्नी सुद्धा कधी न अंतरले ---- १

भलाथोरला देशचि आहे अमेरिका हा जसा
फळाफुलांनी फुलारलेला स्वर्गचि वाटे जसा ---- २

त्या देशाप्रती जाण्याचीही संधी मला लाभली
शितावरुनी त्या भाताचीही जाणीव की जाहली ---- ३

रसाळवाणीमधुनी सांगण्या लागे जी बुद्धी
ठाऊक आहे मला तेवढी नाही माझी मती ---- ४

पिटुकल्याशा खारीपरि ते यत्नचि मी केले
भावलेच जे मला तसे ते वर्णन मी केले ---- ५

पैसा–अडका सारे तेथे आहे मुबलक
घरे नि दारे रस्ते शहरे सारे सुरेख ---- ६

ठेंगणीठुसकी बसकी घरे ती छपरे उतरती
आकाशाला भिडणाऱ्याही दिसती इमारती ---- ७

कसल्याही त्या कामाचा ना कोणा कमीपणा
ठायीठायी असती तेथे शिस्तीच्याच खुणा ---- ८

लाल नि हिरव्या दिव्यांच्या त्या इशाऱ्यावरती
सुसाटवेगे पळती गाड्या त्या रस्तोरस्ती ----९

पोलिसमामांच्या कायद्याची ती भीती असे मनी
म्हणुनि तयांच्या वाटेला ना जाई कधी कुणी ---- १०

अमेरिकेमधि आहे सारे जगताच्या उलटे
लेफ्टहँड ड्राइव्ह करीत गाडी पळत की सुटते ---- ११

राइटटर्न घेण्या कधीही तेथा नलगे परमिशन

परि लेफ्टटर्न घेण्या रस्त्यावरती आखलेली खूण ---- १२

फ्रीवेवरती असती तेथे दोन–चार लेन
घुसाघुशी अन् गैरशिस्तीचे नाही देणं घेणं ---- १३

सुपरबाजारी लहानमोठ्या वस्तूंची दाटी
तारीखवार नि किंमतीचीही प्रत्येका पाटी ---- १४

कोठेही जा पोस्टात सुद्धा हसुनी स्वागत होते
प्रत्येक गोष्टीत ' मेड इन चायनाचे ' दर्शन की घडते ---- १५

अर्ध्यावरती जनता तेथील चिनी जपानी दिसे
काळा–गोरा भेदही तेथे फारसा उरला नसे ---- १६

कॉलेजच्या त्या वाटेला ना विशेष कुणी जाती
दहा–पंधरा वर्षाचीही होती कमावती ---- १७

घराघरातून राजाराणी सुखात नांदती
लहान मुलेही वेळेआधी शहाणीसुरती होती ---- १८

आजी–आजोबा काका–मामा नाती ना उरली
कुटुंबसंस्था कधी न तेथे खोलवरी रुजली ---- १९

लग्नबंधनी अडकत नाही कोणी लवकरी
स्वातंत्र्याच्या उपभोगाची प्रत्येका सुरसुरी ---- २०

स्वच्छतेचे का बा आपणा इतुके ते वाकडे
शिकू नये का आपण त्यांचे दोन चार तरी धडे ---- २१

मधमाशीच्यापरीच आपण चांगले तेवढे घ्यावे
कोठेही जरी गेलो जगती संस्कार न बदलावे ---- २२

लोकसंख्या हे कारण आहे अपुल्या गरिबीचे
कर्तव्यचि ते आहे अपुल्या साऱ्या जनतेचे ---- २३
--------------------------------------------

(अमेरिकेवरील दहशतवाद्यांचे हल्ले)

* फिनिक्स *

भला थोरला वृक्ष एक तो
सकल जगा आधारभूत तो ..१

दूरवरी ती मुळेही गेली
जमिनीमध्ये रुतून बसली ...२

पर्णे ज्याची अगणित होती
फळे नि पुष्पे अनंत येती ..३

भव्य दिव्य तो पारही ज्याचा
शोभे राजा अखिल वनाचा ...४

अनंत पक्षी रोजच येती
विसाव्यासही कोणी थांबती ...५

किलबिल किलबिल सारे करती
गजबजून त्या फांद्या जाती ...६

वादविवादा कधी न करती
सुखात सारे पक्षी नांदती ...७

दिवस एक परि कसा उदेला
ठाऊक नव्हते पक्षीगणाला ...८

प्रभातवात तो मंद सूटला
वृक्षराज तो डुलू लागला ...९

गतकालाची भविष्यवाणी
विसरुनी गेला वृक्ष परी मनी ...१०

क्षणार्धात ते सर्व हादरले

कोणा न कळे काय जाहले ...११

भले थोरले गिधाड आले
वृक्षासचि त्या धडकुनि गेले ...१२

शक्ती त्याची अफाट होती
विषवल्लीही होती संगती ...१३

उन्मळून तो वृक्षही पडला
पक्षीगण त्याखाली अडकला ...१४

धूळ उडाली गगनी भिडली
क्षणात वार्ता जगती कळली ...१५

दुष्ट गिधाडे दोनचार ती
करिती त्यासम दुष्कृतीस ती ...१६

गिधाडांस त्या क्षमा न करता
शिक्षा देईल विश्व एकदा ...१७

कालावधी तो थोडा जाता
वृक्षाची जरी राखचि होता ...१८

राखचि परि ती जन्मा घालील
फिनक्स पक्षी उदया येईल ...१९

अखिल जगातील गिधाडवृत्ती
खचितचि जाईल विलयाला ती ...२०

## * भारतवासी *

भारतवासी नरनारी
कुणीही असो शेजारी
प्रेमाने आम्ही नांदू तरी
परी न खपवू शिरजोरी

भारतवासी नरनारी ---- १

पूर्व नि पश्चिम भेद नसे
उत्तर दक्षिण द्वैत नसे
भारतमाता एक असे
झुकवू मस्तक पदांवरी
भारतवासी नरनारी ---- २

नरनारी ना भेद इथे
धर्म-जात ना पंथ इथे
रक्षण अपुल्या भूमीचे
करण्या शक्ती लावू पुरी
भारतवासी नरनारी ---- ३

झाशीची ती राणी असे
शिवबा अमुच्या मनी वसे
टिळकांचा वरहस्त असे
याद तयांची ठेवू खरी
भारतवासी नरनारी ---- ४

कुठेही असो अतिरेकी
पर्वतावरी चढला की
सागरतळी तो दडला की
शोधुनि त्याला काढू तरी
भारतवासी नरनारी ---- ५

भारतवासी जन सारे
जिंकू आम्ही जग सारे
प्रेमाने ना युद्धाने
जगती शांती आणू खरी
भारतवासी नरनारी ---- ६

✻ मानवता धर्म ✻

माझे तेही असेचि माझे
तुझे तेही म्हणतो मी
असला कसला धर्मचि म्हणता
फसवणूक ही खरी नामी ---- १

देवाने कधी सांगितले का
चोरी लबाडी करा तुम्ही
राम–कृष्ण तर सांगत नाही
येशु–बुद्ध ना अल्लाही ---- २

सदाचार अन् सुविचारच हे
रूप असे हो देवाचे
दुराचार अन् दुर्विचार हे
रूपचि घेई दैत्याचे ---- ३

स्वर्गामध्ये देव ना राही
नरकामधि ना दानवही
मृत्युलोकी परि दोन्ही भेटती
निर्मिती ही मानवहाती ---- ४

सुखी असावे प्रत्येकाने
अपुल्या अपुल्या घरामधे
डोकावुनी ना कधी पहावे
दुसऱ्याच्या त्या घरामधे ---- ५

धर्माच्या त्या नावाखाली
दुष्कृती करती अतिरेकी
लपूनी जरि दुष्कार्या करिती
इतिहासचि त्या साक्षी की ---- ६

सद्धर्मचि हा शाश्वत राहील
अधर्मासि ना थारा रे
उखडुनी टाकील अधर्मासि या

एक होऊनी जग सारे ---- ७

मानवता हा धर्म एकचि
असे खरा या जगामधे
सांभाळचि तो सदा करावा
प्रत्येकाने मनामधे ---- ८